ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 9 | MAY - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सोलापूर जिल्ह्यातील शक्तीदेवता अथवा मातृदेवता मंदिरे व त्यांचे यात्रा उत्सव

प्रा.डॉ.सदाशिव देवकर
इतिहास विभागप्रमुख,
सांगोला महाविद्यालय,सांगोला .



**सारांश**

सोलापूर जिल्ह्यास वैभवशाली सांस्कृतिक परंपरा असून येथील प्राचीन स्थापत्य कलेला एक आगळे वेगळे अधिष्ठान प्राप्त झालेले आहे. सोलापूर जिल्ह्यात सुद्धा देवी उपासना मोठ्या प्रमाणावर चालत होती हे येथील उपलब्ध मंदिरे आणि मूर्ती शिल्पावरून दिसून येते.

**शब्दसूची**

प्रागैतिहासिक व आद्यऐतिहासिक,ऐतिहासिक, तीर्थक्षेत्रे,हेमाडपंती मंदिर स्थापत्यशैली, मुर्तीकला, सभामंडप, अंतराळ, गर्भगृह दंतकथा, आख्यायिका, दैवतकथा.

## प्रस्तावना :

सोलापूर हा ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेला जिल्हा असून येथील जनजीवन वैशिष्टपुर्ण आहे. प्राचीन व मध्ययुगीन काळात सोलापूर जिल्ह्याने राजकीय धार्मिक आणि कलेच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावलेली दिसते सोलापूर जिल्ह्यास वैभवशाली सांस्कृतिक परंपरा असून येथील प्राचीन स्थापत्य कला हे एक आगळे वेगळे अधिष्ठान प्राप्त झालेले आहे.

## संशोधनाची उदिष्टे

१) सोलापूर जिल्ह्यातील मातृदेवता अथवा शक्ती देवता मंदिरांचा ऐतिहासिक व पुरातत्व अभ्यास करणे.
२) मातृदेवता विषयाचे मिथक व महात्मे अभ्यासणे.
३) सोलापूर जिल्ह्यातील यात्रा उत्सव यांचा अभ्यास करणे.
४) मातृदेवतांचा लोकजीवन व स्त्री जीवनावर झालेला परिणाम अभ्यासणे.
५) सोलापूर जिल्ह्याचे पर्यटन विषयक महत्व जाणणे.

## संशोधन पद्धती :

संशोधनासाठी निवडलेल्या विषयाची व्याप्ती व महत्त्व लक्षात घेता संशोधन कार्यपद्धतीची रूपरेषा दोन टप्प्यात केली असून पहिल्या टप्प्यात प्रत्यक्ष सर्वेक्षण करून माहिती संकलित केली आहे व दुसऱ्या टप्प्यात सर्वेक्षणातून संकलित झालेल्या माहितीचा विश्लेषणात्मक व तुलनात्मक पद्धतीने अभ्यास करून रचनात्मक मांडणी करण्यात आली आहे.माहिती संकलनासाठी पुजाऱ्यांच्या

मुलाखती, गावातील ज्येष्ठ नागरिकांशी चर्चा, फोटोग्राफ्स, इंटरनेट या साधना बरोबरच दंतकथा, आख्यायिका, दैवतकथा, स्थानिक लोकसंस्कृतीचे आधार व यात्रा सण उत्सव इत्यादी द्वारे संशोधनाला बळकटी देण्यात आली आहे.

### श्रीक्षेत्र मार्डी येथील श्री यमाईदेवी

सोलापूरच्या उत्तरेस १७ किमी अंतरावर वसलेल्या श्रीदेवी सप्तशती या ग्रंथाचे रचनाकार महान शिवभक्त श्री मार्कंडेय ऋषी यांची तपोभूमी म्हणून मार्कंडेय पुराणात मारोडी(मार्डी) या गावाचा उल्लेख आढळतो. येथे जे शिलालेख प्राप्त झाले आहेत त्यातील उल्लेखावरून मार्डी हे गाव कलचुरी व चालुक्य राजवटी मध्ये वैभव संपन्न गाव होते.त्याची साक्ष देणारे अनेक अवशेष गावात व गावाच्या परिसरात आढळतात त्यामुळे मार्डी या तीर्थक्षेत्राला प्रतिकाशी म्हणून म्हटले जाते. शिव-पार्वती यांचे एकत्रित पुजले जाणारे रूप म्हणजे यमाई. शिवशक्तीस्वरुपिनी यमाई देवीला पार्वती मातेचा त्याचबरोबर रेणुकादेवीचा अवतार मानले जाते . महाराष्ट्रात व अन्य राज्यांत यमाई देवीची अनेक उपपीठे (मंदिरे) आहेत तसे सोलापूर जिल्ह्यात देखील आहेत. या गावात भव्य असे हेमाडपंथी मंदीर आहे. हे मंदीर यादवकालीन असून या मंदीरावर चालुक्य शैलीचा प्रभाव पडलेला दिसून येतो. प्राचीन मंदीर वास्तुकलेचा हा उत्कृष्ठ नमुना म्हणावा लागेल. मंदीराची रचना सभामंडप, अंतराळ, गर्भगृह अशी रचना असून या मंदीराच्या भोवती प्रशस्त प्राकार आहे. मंदीर उत्तरमुखी असून मंदीराचे मुख्यद्वार पूर्वेस आहे. ह्या मंदीराचे बांधकाम रचना विशिष्ट प्रकारात केले असून सूर्य उत्तरायण किंवा दक्षिणयण प्रवेश करण्यापूर्वी तीन दिवस अगोदर म्हणजे गुढीपाडव्याच्या वेळेस सूर्याची किरणे देवीच्या मुखमंडळावर पडतात. सभामंडप भव्य असून सभामंडपाचे 'सर्व स्तंभ कोरीव कामाने सुशोभित केले आहे. सभामंडपाच्या वितानावर कोरीव झुंबर आहेत. मंदीराच्या अंतराळ छोटे असून स्तंभ विरहीत आहेत. गर्भगृहाचे द्वारशाखा अतिशय, कोरीव असून द्वारशाखेच्या दोन्ही बाजूस शैव द्वारपाल कोरले आहे.मंदिर व गावाच्या परिसरात अनेक मुर्तीशिल्पे दुर्लक्षित आहेत या मूर्तीवरुन या गावच्या प्राचीनत्वाची ओळख पटते. गावाच्या कोणत्याही भागात गेल्यास आपणास मंदिराचे व मूर्ती शिल्पाचे अवशेष दिसून येतात.

### कमलाभावानी मंदिर करमाळा

सतराव्या शतकामध्ये मराठा सरदार व तुळजाभवानीचे उपासक राजे रावरंभा निंबाळकर यांच्या काळात एक वैशिष्ट्यपूर्ण बांधकाम शैलीमध्ये या मंदिराचे बांधणी झाली आहे. करमाळ्याच्या पूर्वेला एका माळरानावर रावरंभाजीने एक प्रचंड मंदीर उभे करण्यास सुरुवात केली व त्याचा पुत्र जानोजीराव याने मंदीराचा संपूर्ण भाग बांधून काढला. करमाळा शहरात प्रवेश करत असतानाच कमलादेवीच्या मंदीराचे प्रचंड गोपूरे दिसून येतात. या मंदीराच्या चारही बाजूने भव्य तटबंदी युक्त ओवऱ्या आहेत. या प्रकारास चारही बाजूनी कमानी दरवाजे आहेत. मंदीराचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वेस असून चारही बाजूंनी प्राकारामध्ये प्रवेशद्वार आहेत. पश्चिमेकडील बाजूने एकूण ९६ पायऱ्या चढून गेल्यानंतर भव्य प्रवेशद्वार आहे. त्याच्या आत मुख्य मंदीर आहे. या मंदीराचे सभा मंडप, अंतराळ, गर्भगृह अशी रचना आहे. मंदीराला एकूण ९६ स्तंभ आहेत. हे सर्व स्तंभ कोरीव आहेत. मंदीरास तीन सभामंडपे आहेत. मुख्य सभा मंडपाच्या समोर कीर्तीमुख आहे. व मधोमध मोठे पितळी कासव आहे. वितानाला झुंबर कोरले आहेत. अंतराळ साधे असून चौकोनी आहे. गर्भगृहाची द्वारशाखा कोरीव असून ललाट बिंबावर गणपती कोरले आहे. गर्भगृहाच्या मधोमध कमलादेवीची पूर्णाकृती मूर्ती बसवली असून मूती अष्टभूजी आहे. काळ्यापाषाणात कोरलेले ही मूर्ती महिसासुरमर्दिनी रुपात आहे मूर्ती विविध अलंकाराने सुशोभित केलेली आहे. तसेच मूर्तीच्या अंगावर अनेक सुवर्ण अलंकार घातलेले आहेत. मुख्य गर्भग्रहाच्या वर शिखर असून या शिखरावर देवदेवतांची एकूण ९६ चित्रे शिल्पित केलेली आहेत. शिखराचा कळस हा सोन्याचा आहे. शिखरावर मुस्लीम स्थापत्यकलेचा प्रभाव पडलेला आहे. कळसात मध्यभागी घुमट असून चार मध्यभागी मिनार कोरलेल आहेत. तर कलमाखाली कमळपुष्पे कोरली आहेत. जाळया, वेलबुट्या, फळेफुले यांचे सुबक शिल्पकाम केले आहे. मंदीराच्या प्रदर्शनामार्गत एक शिवमंदीर व एक गणेश मंदीर आहे. तसेच सूर्यनारायणाचे मंदीर व विष्णूमंदीर देखील आहे. एकंदरीत कमलाभवानी मंदीर हे मंदीरवास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. मंदीराच्या समोर भव्य दीपमाळा असून त्या दीपमाळाच्या शिखरावर पोहचण्यासाठी ९६ पायऱ्या आहेत. त्याचप्रमाणे मंदीराच्यासमोरील बाजूस दोन समाधी मंदीरे असून हे मंदीर अतिशय कोरीय कलाकुसरीने बांधलेले आहेत.देवीचा नवरात्र उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो वार्षिक यात्रा पौर्णिमा ते चत्तुर्थी काळात साजरी केली जाते.

## अंबिकादेवी मंदिर सांगोला

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला हे तालुक्याचे ठिकाण असून येथील किल्ला आदिलशाही काळात (१४८९–१६८६) बांधला गेला असून तत्कालीन कागदोपत्री सांगोला एक भरभराटीचे स्थान मानले जाई. त्यामुळे त्याची ख्याती 'सांगोला सोन्याचे' अशी होती. इसवी सन 1676 मध्ये छत्रपती शिवाजी महाराज भागानगरला जाताना सातारा जिल्ह्यातून आटपाडी, सांगोले, जत मार्गे गेले असावेत. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात इसवी सन १२७३ व १२७५ मधील प्रसिद्ध असा चौऱ्यांशीचा शिलालेख आहे त्यामध्ये माणदेशचा पहिला स्पष्ट नामोल्लेख तसेच 'सांघोले' स्पष्ट नामोल्लेख सापडतो.गावात मूर्ती शिल्पे विरगळ, सतीस्तंभ, जुने वाडे, वेस, भग्न बुरुज, बारव आढळतात हे सर्व अवशेष प्राचीन इतिहासाची साक्ष देतात. सांगोला शहराचे ग्रामदैवत अंबिका देवी मंदिराच्या बांधकाम शैलीवरून सदरील मंदिर यादवोत्तर काळातील म्हणजे चौदावे वे किंवा पंधराव्या शतकामध्ये बांधले असावे असे दिसून येते.मुखमंडप,सभामंडप,गर्भगृह अशी रचना असून मंदिराचे स्तंभ साधे आहेत.या मंदिरामध्ये अलीकडच्या काळात जीर्णोद्धार करून मंदिराचे शिखर आधुनिक पद्धतीने बनवले गेले आहे. मंदिराच्या बाहेरील बाजूस रथाचे दगडी चाक भग्न शिवलिंग व नंदी आणि पादुका ठेवण्यात आल्या आहेत यावरून देखील मंदिराची प्राचीनता लक्षात येते.मंदिरातील मूळ मूर्ती आक्रमणामध्ये भग्न झाले असावेत त्या ठिकाणी अलीकडच्या काळात घडवलेल्या मूर्ती बसवण्यात आल्या आहेत मुख्य अंबिका देवीची मूर्ती देखील बसवण्यात आलेली आहे. मंदिराच्या समोर दोन दीपमाळा आहेत. तसेच येथे जुन्या काळातील धर्मशाळा ही आहे. या मुख्य मंदिराबरोबरच येथे मारूती, चिंतामणी आणि नागनाथ या देवतांची लहान मंदिरे आहेत. दरवर्षी अश्विन प्रतिपदेपासून नवरात्र उत्सव साजरा करण्यात येतो शिवाय सांगोल्याचे ग्रामदैवत असणाऱ्या सांगोला या ठिकाणी माघ महिन्यात रथ सप्तमीला खूप मोठ्या प्रमाणात यात्रा भरते या यात्रेच्या दरम्यान खिलार व इतर जनावरांच्या खरेदी विक्रीचा मोठा व्यवहार होतो यात्रेत खिलारे जनावरांचा प्रदर्शन दारूकाम व कुस्त्या आणि कृषी प्रदर्शन भरवले जाते.शारदीय नवरात्र आणि पौष महिन्यातील शाकंबरी नवरात्रामध्ये भरगच्च धार्मिक कार्यक्रम साजरे होतात.

## माढेश्वरीदेवी मंदिर माढा

माढा गावाचे ग्राम दैवत माढेश्वरी देवीमुळे हे माढा हे नाव पडले असून मनकर्णा नदीच्या काठावर भव्य असे मंदिर असून श्रीमंत रावरंभाजी निंबाळकर यांनी 1727 च्या कालखंडामध्ये या मंदिराची बांधणी केली आहे. माढा गावात आज हे सुस्थितीत असा छोटे खाणी देखना भुईकोट किल्ला आहे किल्ल्याचे प्रवेशद्वार उत्तराभिमुख असून या किल्ल्याची निर्मिती रावरंभाजी निंबाळकर यांनी 1710 साली केले. माढेश्वरी मंदीर वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना म्हटले तरी वावगे ठरणार नाही, मंदीराच्या सभोवताली भव्य असा प्राकार आहे. पूर्वेकडील मुख्य प्रवेशद्वार कोरीव कामाने सुशोभित केले असून त्यावर नक्षीदार असे दगडी कमान आहे. मंदीराच्या समोरील बाजूला भव्य अशा दीपमाळा, तटबंदिला लागून एक बारव आहे (कल्लोळ) मंदीराच्या तटबंदीच्या भिंतीस पूर्व, पश्चिम, दक्षिण अशा तिनही बाजूस ३९ ओवऱ्या आहेत. व काही खोल्यांचे बांधकाम केले आहे. मंदीराला भव्य असे शिखर आहे. मंदीराला एकूण ४८ स्तंभ असून हे सर्व स्तंभ कोरीव आहेत. गर्भगृहाच्या मधोमध देवीची मूर्ती आहे व ही मूर्ती चर्तुर्भूज असून उजव्या हातात सुरा, डाव्या हातात ढाल, खालच्या हातात त्रिशूल आहे. तो त्रिशूल दैत्याच्या पोटात मारलेला आहे. पाठीमागील बाजूस प्रभामंडळावर प्राचीन कला वैभवाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. तसेच नाईक निंबाळकरांचा वाडा स्थापत्य कलेचा उत्कृष्ठ नमूना आहे.

अश्विनातील नवरात्रात माढेश्व.रीच्याई मंदिरात उत्सव असतो. पूर्वी नऊ दिवस स्त्रिया, पुरुष उपवास करत व उभे राहत असत. म्हणून त्याला 'खडे नवरात्र' असेही म्हणत. कोजागिरीला देवळात मोठी यात्रा भरते. देवळाच्या आवारात हत्ती, घोडा, नंदी अशी देवीची वाहने (लाकडी) आहेत. त्या वाहनांवरून रात्री बारा वाजता देवीचा छबिना निघतो.

## कनकंबा देवीमंदिर करकंभ

पंढरपूर तालुक्यातील राजकीय राजधानी म्हणून करकंब ओळखले जाते ,कनक अर्थात सोने अंबा म्हणजे देवी कनकंबा देवी हे करकंब चे जागृत देवस्थान असून कनकंबा देवीच्या नावावरून गावाचे नाव करकंब चे नाव पडले आहे. प्राचीन आणि मध्ययुगीन काळात हे गाव प्रसिद्ध होते.गावामध्ये ऐतिहासिक खाणाखुणा विखुरेल्या आहेत या गावामधील माती पांढरी आहे.गावाच्या वेशीपासून सुमारे १किमी अंतरावर असणारे कनकंबा देवीचे मंदीर हे गावाचे प्रमुख ऐतिहासिक स्थान मानले जाते. कणकंबा देवीचे मंदिर गावच्या मध्यभागी आहे हे मंदिर पुराभिमुख आहे मंदिराची रचना सभामंडप अंतराळ गरज अशा प्रकारचे आहे मंदिराला प्रदक्षिणापद देखील आहे.गर्भगृहमध्ये देवीचे महिषासुरमर्दिनी रूपातील मूर्ती असून ती स्थानक आलीढ आहे . महिषासुर राक्षसाचा वध करणारे शिल्प अतिशय सुरेख आहे.

देवीला अलंकार व आभूषणाने सजवलेली आहे. शैव वैष्णव शाक्त संप्रदायाचे हे प्राचीन नगर असल्याचे दिसून येते.या देवीच्या मंदीराच्या सभामंडपामध्ये भुयार आहे. या भुयाराची लांबी सुमारे १५ किमी इतकी लांब आहे. या भुयाराची उंची ही खूप आहे. या भुयारामधून शत्रूपासून बचाव करण्यासाठी गावातील लोक घोडया वरुन स्वतःचे व गावाचे संरक्षण करीत असत या वरुनच या भुयाराचा विस्तार समजतो.छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात साम्राज्यावर चालून आलेला अफजलखानाने हिंदूची देवळे उद्ध्वस्त करण्याचा चंग बांधला होता. त्याचवेळी कनकंबा देवीची सोन्याची मूर्ती अफजलखानाने पळवून नेली अशी अख्यायिका सांगितली जाते.नवरात्र निमित्त देवी मंदिरात वेगवेगळे धार्मिक कार्क्रामाचे आयोजन केले जातात.

## अकलाईदेवी मंदिर अकलूज

मराठी दौलतीच्या इतिहासात अकलूज गावचे महत्त्व फार मोठे आहे नीरा नदीच्या काठावर हे गाव आज राजकीय शैक्षणिक सांस्कृतिक कार्यात जिल्ह्यात अग्रेसर आहे इतिहास काळात ही राजकीय घडामोडीचे हे जणू केंद्रच बनवून राहिले अ कलाई देवी च्या नावावरून अकलूज हे ग्रामनाम पडलेले आहे. मोघल काळामध्ये हे गाव अदसपुर या नावाने ओळखले जात होते अकलूज शहरामध्ये तेराव्या शतकातील यादवकालीन भुईकोट किल्ला आहे.मराठ्याच्या इतिहासामध्ये देखील या भुईकोट किल्ल्याला महत्त्व प्राप्त झाले होते. अकलूज गावच्या पूर्वेला निरा नदी तीरावर १९८३ मध्ये अकलूजचे ग्रामदैवत श्री अकलाईदेवीचे अतिशय सुंदर मंदीर बनवण्यात आले आहे. हे मंदीर आधुनिक पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असून महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री श्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनी पर्यटन विकास आराखड्यातन येथील मंदीराचा पर्यटन खात्याच्या माध्यमातून कायापालट करून एक भव्य देखणी वास्तू तयार केलेली आहे.गाभाऱ्यातील मूर्ती सिंह रोड आहे गर्भगृहाच्या दारावरील लाकडी कोरीव काम अत्यंत सुरेख पद्धतीने करण्यात आले आहे शिवाय मंदिराचे शिखर देखील अत्यंत सुंदररीत्या करण्यात आले आहे मंदिराच्या सभा मंडपाचे बांधकाम जाळीदार आहे घडीव व ताशीव दगड एकावर एक ठेवून छत झाकले गेले आहे. गर्भग्रह अष्टकोनी असून बाहेरील बाजूस सज्जा बनवला आहे त्यावर उत्तर व दक्षिण गोमुखाचे शिल्प आहे. मंदिर बांधत असताना अध्यात्म आणि वास्तुशास्त्र या दोन्हीचा मेळ घातलेला दिसून येतो.हे मंदीर आधुनिक काळात बांधले गेले असले तरी प्राचीन मंदीर वास्तुकलेचा यावर प्रभाव पडलेला आहे. विशेष करून या परिसराचे सुशोभिकरण केल्यामुळे हे मंदीर पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आअकलूजच्या अकलाई मंदिरामध्ये वर्षभर वेगवेगळे धार्मिक उत्सव पार पडले जातात शारदीय नवरात्र महोत्सवामध्ये अश्विन शुद्ध प्रतिपदा ते अश्विन शुद्ध दशमी पर्यंत वेगवेगळे पारंपारिक उत्सव साजरे केले जातात.

## यल्लम्मा देवी मंदिर कासेगाव

मध्ययुगीन परगाणे कासेगाव चाळीस गावांचा मुख्यालय होते. परंतु त्या अगोदरच्या पुरातत्वीय पाउलखुणा गावाच्या परिसरात पहावयास मिळतात.गावात यादवकालीन मंदिरे व मंदिराचे अवशेष पहावयास मिळतात. सध्या यल्लम्मा देवी मंदिर आहे त्याची द्वार शाखा देखील यादव कालीन आहे नवरात्र मध्ये देवीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात, यात्रेत सहभागी होणारे जोगती हे यल्लमा देवीच्या यात्रेचे वैशिष्ट्य आहे. येथील यात्रेला जवळपास १०० वर्षांपेक्षा जास्त काळाची परंपरा आहे. या यात्रेचा मान कासेगावच्या देशमुख घराण्याला आहे. दक्षिण भारतातील यल्लम्मा हि एक मातृदेवता असून कर्नाटकातील सौंदत्ती (जि. बेळगाव) हे तिचे मुख्य स्थान मानले जाते. ती कर्नाटक, महाराष्ट्र व आंध्र या प्रांतांतील असंख्य लोकांची उपास्य देवता व अनेक कुटुंबांची कुलदेवता आहे. ‘यल्लम्मा’ या कानडी शब्दाचे ‘सर्वांची माता’ आणि ‘सप्तमातृका’ हे दोन्ही अर्थ तिचे सर्जनशील मातृस्वरूप दर्शवितात.यल्लम्मा व रेणुका यांचे ऐक्य मानले जाते. गंधर्वांची जलक्रीडा पाहताना विचलित झालेल्या रेणुकेचा जमदग्नीच्या आज्ञेवरून परशुरामाने वध केला आणि तिला पुन्हा जिवंत करताना मातंगीचे मस्तक तिच्या धडाला व तिचे मस्तक मातंगीच्या धडाला जोडले गेले,अशी पुराणकथा आहे.जिवंत झालेल्या दोघींपैकी एक यल्लम्मा व दुसरी मरिअम्मा बनली. काळाच्या ओघात स्थानिक मातृदेवतेचे पुराणातील रेणुकेशी ऐक्य झाले, हे या कथेवरून सूचित होते. तिला पार्वतीचा अवतार मानण्यात आले असून लज्जागौरी, एकवीरा, जोगुळांबा, भूदेवी, मातंगी, यमाई व सांतेरी ही तिचीच रूपे होत, यल्लम्माचे वैधव्य सूचित करण्यासाठी तिची मानवी प्रतिनिधी असलेल्या जोगतिणीचा माघी (रांडाव) पौर्णिमेचा चुडा फोडतात आणि सौभाग्य सूचित करण्यासाठी ज्येष्ठी (अहेव) पौर्णिमेला पुन्हा चुडा भरतात, ही प्रथाही तिचे हे स्वरूप स्पष्ट करते.

कासेगावची यल्लमा देवी ही देशभरातील जग जोगत्यांची आराध्य दैवत आहे.त्यामुळे शारदीय नवरात्र उत्सवात नऊ दिवस वेगवेगळ्या रुपात देवीस सजवले जाते.संपूर्ण गावास यात्रेचे स्वरूप प्राप्त होते.

## महालक्ष्मीदेवी मंदिर कोळे

कोळे या गावात वेगवेगळ्या कालखंडात बांधलेले दोन हेमाडपंथी मंदीरे आहेत. हे दोन्ही मंदीरे मंदीर वास्तुकलेच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. महालक्ष्मी मंदीर है कोळे गावचे ग्रामदैवत असून या मंदीराची रचना उंच पीठावर केली असून ते क्षिप्त उक्षिप्त अशी नक्षत्राकृती आहे. या मंदीराची रचना सभामंडप, अंतराळ, गर्भगृह अशी आहे. सभामंडपाच्या समोर अलिकडच्या काळात भव्य असा सभामंडप बांधलेला आहे.मंदीराचे मुखमंडप व सभामंडप साधे असून दोन स्तंभावर हे सभामंडप आहे. याच्या दोन्ही बाजूस आयताकार सभामंडप आहे. सभामंडपाचे स्तंभ साधे आहेत. सभामंडपाच्या वितानावर साधे झुंबर कोरलेले आहे.अंतराळ साधे असून छोटे असून त्याच्या आधारासाठी दोन अर्धस्तंभ आहेत. या मंदीराचे गर्भगृह चौकोनी असून गर्भगृहाची द्वारशाखा कोरीव आहे. ही द्वारशाखा पाच शाखेमध्ये असून पुष्पशाखा, स्तंभाशाखा, वेलबुट्टी व स्तंभांचे अशा शाखेत आहेत. गणेशपट्टीच्या मधोमध गणपती कोरलेला आहे. खालच्या बाजूस उंबऱ्यावर दोन कीर्तीमुख कोरलेले आहेत. द्वारशाखेचे स्तंभ अतीशय कोरीव असून त्यामुळे द्वारशाखा अधिक सुंदर दिसते. गर्भगृहाच्या मधोमध देवकोष्टकावर देवी प्रतिमा आहे. ही देवी मूर्ती वेगवेगळ्या अलंकाराने सजवलेली आहेत. गर्भगृहाच्या पूर्व व पश्चिम दिशेस दोन्ही बाजूला तीन-तीन मूर्ती विरहीत देवकोष्टके आहेत. गर्भगृहाचे वितान घुमटाकार व वर निमूळते होत जाणारे आहे. या मंदीरास भव्य असे शिखर असून या शिखराचे काम अलिकडच्या काळात केलेले असावे असे वाटते. या शिखरावर वेगवेगळ्या देवदेवतांच्या मूर्ती बसवलेले आढळतात. मंदीराच्या बाहेरील परिसरात वीरगळ मोठ्या प्रमाणात आढळतात. संपूर्ण मंदीराला भव्य प्राकार आहे. बहुदा तो नंतरच्या काळात बांधलेला असावा.मंदिराच्या बांधकाम शैलीवरून हे साधारण १३ व्या शतकात बांधले असावे असे वाटते.

शारदीय नवरात्र मध्ये देवीसमोर वेगवेगळे धार्मिक कार्यक्रम चालतात.या नऊ दिवसात देवीच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी असते.

## शाकंभरीदेवी मंदिर भाळवणी

भाळवणी हे गांव ऐतिहासिक असून तेथे अनेक ऐतिहासिक वास्तू आज उपलब्ध आहेत काही वास्तू सुस्थितीत असून काही भग्नावस्थेत आहेत. या गावाचा इतिहास आपणास इ. स१२ व्या १३ व्या शतकापासून आपणास उपलब्ध विविध वास्तू आणि मंदीरावरुन समजतो. या गावात प्रामुख्याने महादेव मंदीर आणि शाकंभरी (बनशंकरी) ही दोन हेमाडपंथी मंदीरे आज आपणास सुस्थितीत पहावयास मिळतात तसेच इ. स. १६ व्या शतकातील नाईक निंबाळकर वाडा आणि औरंगजेबाच्या काळातील मशिद आपणास पाहावयास मिळते तसेच तेथे एक अष्टभुजा गणेश मंदीर देखील आहे.

एक शक्तिपीठ देवता. हिला बनशंकरी असेही म्हणतात. कर्नाटकात ह्या देवतेची मंदिरे आढळतात. तेथील अनेक व महाराष्ट्रातील काही कुटुंबांची ही कुलदेवता आहे. एका आख्यायिकेप्रमाणे कर्नाटकातील बनशंकरी क्षेत्रात एकदा शंभर वर्षांचा दुष्काळ पडला, तेव्हा ह्या देवीने आपल्या शरीरातून शाकभाज्या निर्माण केल्या (शाकान् बिभर्ति इति). त्याचप्रमाणे पाताळातून हरिद्रातीर्थाचे पाणी आणून लोकांच्या जीविताचे रक्षण केले.शाकंभरी मंदीरातील मूर्ती सिंहासनावर बसलेली आहे. या मूर्तीची अवस्था अत्यंत शांत दिसते. मूर्तीचा एक पाय खाली सोडलेला दिसतो व दुसरा पाय दुमडलेला आहे. मूर्ती चतुर्भुज असून एका हातात डमरु, दुसऱ्या हातात त्रिशूल, तर तिसऱ्या हातात भाला, तर चौथ्या हातात चक्रासारखे दिसते देवीच्या डोक्यावर मुगूट आहे.

मंदिर जमिनीपासून ४ फूट उंच पीठावर उभारलेले आहे. मंदिर हेमाडपंथी शैलीत बांधले असून मंदिराचे स्तंभकोरीव आहेत. सभामंडपात प्रवेश करताना २ स्तंभ आहेत नंतर सभामंडपात ओळीत ४-४ स्तंभ दिसतात त्यावर पूर्ण मंडप टेकलेला दिसतो. या मंदीराचे शिखर ४० फूट उंचीचे आहे. ते शिखर आकाराने कमी कमी होत जाणारे आहे. शिखरावर विविध मूर्ती आहेत. शिखराच्या खालच्या टप्प्यावर अर्धे शरीर स्त्रीचे आणि हत्तीच्या तोंडाचे आहे. तोंडाच्या खाली पाय आहेत. तसेच त्याच्या वरच्या टप्प्यावर विविध देवतांच्या मूर्ती दिसतात. मंदिराच्या शिखराचे बांधकाम चुन्यात केलेले दिसते. शिखरावर छोटासा कळस आहे.मंदीराच्या समोर साधारण ४० ते ४५ फुट उंचीच्या दोन दीपमाळ आहेत त्या कोरीव दगडात असून आज ही त्या सुस्थितीत आहेत. यात्रेच्या दिवसी त्यावर वर चढून त्या पेटवल्या जातात, या दीपमाळेस तीनही बाजूनी पायऱ्या आहेत. या दीपमाळेच्या तळात दक्षिणेकडे मारुती आहे. पश्चिमेस महादेव आहे. तेथेच चारही बाजूस दगडाचे हत्ती बनवलेले आहे. ह्या देवीच्या नवरात्राचा उत्सव पौष शुद्ध सप्तमीपासून (काही ठिकाणी अष्टमीपासून) सुरू होऊन, तो पौर्णिमेला संपतो. यालाच शाकंभरी नवरात्र असे म्हणतात.

**निष्कर्ष –**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये सोलापूर जिल्ह्याला महत्त्वपूर्ण स्थान प्राचीन व मध्ययुगीन काळात सोलापूर जिल्ह्याने राजकीय धार्मिक आणि कलेचा क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावलेली दिसते सोलापूर जिल्ह्यास वैभवशाली सांस्कृतिक परंपरा असून येथील प्राचीन स्थापत्य केलेला आहे एक आगळे वेगळे अधिष्ठान प्राप्त झालेले आहे.सोलापूर जिल्ह्यातील प्राचीन मंदिर व मूर्ती शिल्पापैकी बारावी शतकानंतर बांधलेली मंदिरे मोठ्या प्रमाणात पहावयास मिळतात सदर मंदिरेही यादवकाळात बांधली असल्याचे लिखित पुरावे शिलालेखाच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत.प्राचीन काळातील उपासनेमध्ये देवी उपासनेला महत्त्वाचे स्थान होते त्याचे मुख्य कारण मानव स्त्रीचे महत्त्वाचे स्थान हे असावे मातेच्या रूपातील देवी ही जन्म आणि संवर्धनाकरता जबाबदार समजली जाते तसेच ती शत्रूंचा सहार करते म्हणून दाखवली जाते देवी उपासना केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेर देखील मोठ्या प्रमाणात चालू होती. सोलापूर जिल्ह्यात सुद्धा देवी उपासना मोठ्या प्रमाणावर चालत होती हे येथील उपलब्ध मंदिरे आणि मूर्ती शिल्पावरून दिसून येते. श्री क्षेत्र मार्डी हे ठिकाण सोलापूर जिल्ह्यातील प्राचीन स्थळ, उल्लेखनीय तीर्थक्षेत्रे, ऐतिहासिक स्थळ , धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून ओळखले जाते. करमाळयाचे जहागीरदार निंबाळकरांनी आपल्या कुलाभिमानातून कमला भवानी मंदीराचे बांधकाम करताना ९६ खांब, ९६ ओवऱ्या, ९६ शिल्पे, हे सर्वत्र ९६ चे सुत्र पाळताना या विहीरीच्या पायऱ्यांची संख्या देखील ९६ ठेवल्याचे दिसून येते. प्राचीन माणदेशातील सांगोला हे ठिकाण ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण समजला जातो कारण छत्रपती शाहूंच्या निधनानंतर (१७४९) रामराजे यांना विधिवत सातारच्या गादीवर आले पेशवे व रामराजे यांत २५ सप्टेंबर १७५० रोजी सांगोला येथे करार झाला. त्यानुसार पेशव्याने छत्रपतींच्या नावे दौलतीचा कारभार करावा असे ठरले. . करकंभ या गावाला शिवकालीन तलावाचा इतिहास आहे. इ. स. सनाच्या १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी करकंब या गावामध्ये पाण्याची सोय व्हावी म्हणून तलाव बांधल्याचा उल्लेख मिळतो.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१) डॉ. भाग्यश्री काळे, महाराष्ट्राची मंदिर शैली, डायमंड प्रकाशन, पुणे, २००९
२) डॉ. अरुणचंद्र पाठक, महाराष्ट्रातील कला व स्थापत्यकला,
३) श्री. गोपाळ देशमुख, सोलापुर जिल्हयाची वखर, रेव प्रकाशन, पंढरपूर, १९८१
४) श्री. ग.ह. खरे, ऐतिहासिक फारशी साहित्य प्रकाशन, भा. इ.सं.मं.पुणे, खंड ५
५) सदाशिव देवकर सोलापूर जिल्ह्यातील प्राचीन सांस्कृतिक आणि पुरातव्यीय कलावैभव सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयास सदर केलेला अप्रकाशित शोध प्रबंध, सोलापूर, २०१०
६) डॉ.सौ जयश्री ज्ञानदेव रणनवरे, पंढरपूरचे सांस्कृतिक वैभव, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर, २००६, पृ
८) श्री. वामन धोंडो देशपांडे, प्रकाशन, श्री यल्लामा देवीचे देवस्थान व्यवस्था मंडळ, कसबे कासेगाव,
९) म.श्री माटे प्राचीन भारतीय कला कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 1976
१०) ग.ह खरे मूर्ती विज्ञान भारतीय इतिहास संशोधन मंडळ पुणे दुसरी आवृत्ती 2012
११) नी.पू जोशी भारतीय मूर्तीशास्त्र कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 1978
१२) कुंभार आनंद सोलापूर जिल्ह्यातील पुराभिलेखांचा अभ्यास संशोधक त्रैमासिक धुळे जून 2004